अल्प मुदतीचे अर्धवेळ/पूर्णवेळ पदविका/
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास
परवानगी देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.पीटीआय २०२के/(१४२/२०००)/तांशि-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २००२.

संदर्भ:- १) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.२/एनजीसी/२०००/ ३९६४, दि.४ ऑक्टोबर, २००१. चे पत्र

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अल्पमुदतीच्या व एम.सी.एम. या सारख्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना परवानगी देण्याचा सध्या विचार करीत नाही. म्हणून सदर अभ्यासक्रमांना शासन स्तरावरच कायम स्वरूपी विना अनुदान तत्वावर मान्यता देण्याची कार्यवाही केली जाते.

महाराष्ट्र अध्यादेश क्र.२३ नुसार नवीन महाविद्यालयांना परवानगी देण्याचा दि.१५ जुलै.२००१ हा अंतिम दिनांक होता. तथापि, आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट चे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट, शिरपूर, जि.धुळे ही संस्था जुनी असून तेथे A.D.S.T.M. व M.C.A. हे अभ्यासक्रम विद्यापीठामार्फत चालविले जात असून एम.सी.एम. हा अभ्यासक्रम ४५ प्रवेश क्षमतेसह सुरू आहे. सदर अभ्यासक्रम सन १९९७-९८ पासून विद्यापीठाने विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८४(४) प्रमाणे परवानगी दिलेली आहे. सदर संस्थेमध्ये सन २००१-०२ पासून एम.सी.एम. हा अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. शासन आता या शासन निर्णयान्वये खाली नमूद केल्यानुसार संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या अभ्यासक्रमांस महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) च्या तरतुदीनुसार सन २००१-०२ पासून विना अनुदान तत्वावर खालील अटी व शर्तीवर मंजूरी देत आहे.

IMRD, SHIRPUR
INWARD NO. 23/2001-02
DATE 28/02/02
SIGN.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट चे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट, शिरपूर, जि.धुळे | एम.सी.एम. | ४५ |

सदर मंजूरी खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

- सदर मंजूरी कायम विना अनुदानित तत्वावर राहील.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जर या अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी काही वर्षानंतर विचार केला तर संस्थने परिषदेकडे अर्ज करणे क्रमप्राप्त राहील व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता न मिळाल्यास सदर अभ्यासक्रम तात्काळ बंद करावा लागेल.
- शासनाने/ विद्यापीठाने विहित केलेले नियम व अटी पाळणे बंधनकारक राहील.
- विना अनुदानित संगणक संस्था / व्यवस्थापकीय महाविद्यालयांच्या बाबतीत शासनाकडून विहित करण्यात आलेल्या/ येणाऱ्या नियमांचे, प्रवेश नियमांचे आरक्षण, अनामत रक्कम, शिक्षण शुल्क यांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक आहे.
- या अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणासाठी विद्यापीठाची मान्यता घेणे संस्थेस बंधनकारक राहील.
- विद्यापीठ कायदा,१९९४ नुसार नुसार कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. ह. क्षीरसागर )
शासनाचे सहसचिव.

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक.
कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालकामार्फत)
संबंधित संस्था,
निवड नस्ती/तांशि-२.